## तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ

**सत्र खटला क्र. ११७/२०२१**
**निशाणी क्र. ६४**

**महाराष्ट्र शासन** तर्फे पो.स्टे. वडगाव रोड सरकारी अभियोक्ता

**..वि..**

**विलास महादेव मानतुटे +१** आरोपी.

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. २** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | विठोबा सखाराम वाघमारे |
| वय अंदाजे ६० वर्षे | धंदा- सेवानिवृत्त कर्मचारी |
| राहणार | भोसा, ता. जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. ए. ए. मोहोड सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

तुळसाबाई सुर्यभान टाले ही माझी बहिण आहे व तिला दोन मुली व एक मुलगा होता. नर्मदा ही तुळसाबाईची सर्वात लहान मुलगी होती. नर्मदाचे लग्न आरोपी विलास मानतुटे यांच्या सोबत मे-२०१३ मध्ये झाले होते. लग्न झाल्यानंतर तिला सहा महिन्यापर्यंत आरोपी व त्यांच्या कुटूंबीयांनी चांगली वागणूक दिली. त्यानंतर सणा-वारा निमित्य नर्मदा जेव्हा माहेरी येत होती तेव्हा ती सांगत होती की "माझा पती विलास आणि सासूबाई सिताबाई मानसीक त्रास देतात''. नर्मदा असे सुध्दा माहेरी सांगत होती की "विलास दारु पिण्याच्या सवईचा आहे व तो दारु पिवून तिला मारझोड करतो''. तसेच सासूबाई सुध्दा नर्मदाला म्हणत असे की "तु बह्याड आहे , तुला कामधंदा येत नाही''. असे म्हणून तिला तिची सासू मानसीक त्रास देत होती.

२. त्यामुळे मी व माझी बहिण तुळसाबाई, आरोपी विलासला समजवुन सांगत होतो. रंजना माझी पत्नी आहे. माझी पत्नी रंजना सुध्दा आरोपी विलासला समजवुन सांगत होती. मात्र तरी सुध्दा आरोपींच्या वागणूकीमध्ये कोणताही फरक पडला नाही.

३. माहे डिसेंबर २०१५ मध्ये अवधूतवाडी पोलीस स्टेशन, यवतमाळ येथे नर्मदाने आरोपी विलासच्या विरोधात मानसीक व शारीरिक त्रास देण्याबाबतची तक्रार दिली. त्यानंतर आरोपी विलास हा फिर्यादी तुळसाबाई टाले यांच्याकडे गेला व तक्रार मागे

घेण्याबाबत त्याने तुळसाबाईला म्हटले. त्यावेळी आरोपी विलासने म्हटले की "मी नर्मदाला चांगले वागवतो, त्रास देणार नाही, तक्रार मागे घ्या''. त्यामुळे नर्मदाने तक्रार मागे घेतली. त्यानंतर नर्मदाला दिवस राहिले (नर्मदा गरोदर राहिली) व त्यामुळे नर्मदाला आरोपीने तिच्या माहेरी आणले व त्यानंतर तिला मुलगी झाली. मात्र, मुलगी पाहायला आरोपी एक ते दिड वर्षे आले नाही. त्यानंतर नर्मदाची मुलगी आजारपणामुळे मयत झाली.

४. तुळसाबाई मला सांगत होती की "नर्मदा तिला म्हणत होती की सासरी जायचे आहे, मला त्याठिकाणी नेवून सोडा". दिनांक २४/१२/२०१८ रोजी सकाळी मला तुळसाबाईचा फोन आला व तुळसाबाईने मला म्हटले की "भाउ मी, नर्मदा हिला बोरज या गावी (आरोपीच्या गावी) नेवून सोडत आहे / नेत आहे". त्यानंतर तुळसाबाईने नर्मदाला आरोपींच्या घरी आणले. मात्र आरोपींनी नर्मदाला तिच्या घरी घेतले नाही, तर आरोपी हे घराला कुलूप लावून निघून गेले. त्यानंतर तुळसाबाई तेथून तिच्या घरी भोसा या गावी परत आली. मात्र, नर्मदा ही आरोपींच्या घराच्या समोरच थांबलेली होती.

५. त्यानंतर आरोपी हे त्यांच्या स्वतःच्या घरी संध्याकाळी अंदाजे ४.०० ते ५.०० च्या दरम्यान परत आले. त्यानंतर आरोपींनी दोन-तिन महिला व दोन-चार माणसाच्या मदतीने नर्मदाला तिच्या माहेरी ऑटोमध्ये बसवून आणले. नर्मदा म्हणत होती की तिला तिच्या सासरीच राहावयाचे आहे. त्यावेळी आरोपी म्हणत होते की "नर्मदाला आम्हाला वागवायचे नाही". त्यानंतर आरोपी तेथून निघून गेले. त्यावेळी नर्मदा सुध्दा आरोपींच्या मागे धावत-धावत गेली. मात्र आरोपी थांबले नाही. त्यानंतर, नर्मदाने रस्त्यालगत असलेल्या विहिरीमध्ये उडी घेतली. त्यामुळे नर्मदा मयत झाली. आरोपी विलास व सिताबाई यांच्या मानसीक व शारीरिक त्रासामुळे नर्मदाने विहिरीमध्ये उडी घेतली व आत्महत्या केली. मी आरोपींना ओळखतो. आज आरोपी विलास न्यायालयात हजर आहे.

६. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते.

**उलट तपासणी आरोपींचे वकील श्री. ए. जे. तगाले यांचे मार्फत सुरु -**

७. माझे भाउ रामाजी सखाराम वाघमारे असून ते भोसा येथे राहत होते. मात्र ते मयत झालेले आहे. मी जुन -२०१७ पासून ते सन २०२० पर्यंत दिग्रस येथे राहत होतो. हे

म्हणणे खरे आहे की नर्मदा माझ्या गावी दिग्रस येथे कधीही आली नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की एक वेळा ती दिग्रस येथे आली होती. हे म्हणणे खरे आहे की मला फिर्यादी तुळसाबाईने नर्मदाला असलेल्या कथित त्रासाबाबत माहिती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की तुळसाबाईच्या घरी माझे भाउ रामाजीचे जाणे-येणे होते.

८. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. मी पोलीसांना बयान देते वेळी असे सांगीतले होते की *"तरी सुध्दा आरोपींच्या वागणूकीमध्ये कोणताही फरक पडला नाही"*, तसेच *"माहे डिसेंबर २०१५ मध्ये अवधूतवाडी पोलीस स्टेशन, यवतमाळ येथे नर्मदाने आरोपी विलासच्या विरोधात* ***मानसीक व शारीरिक त्रास देण्याबाबतची*** *तक्रार दिली"*, तसेच *"त्यानंतर आरोपी विलास हा फिर्यादी तुळसाबाई टाले यांच्याकडे गेला व तक्रार मागे घेण्याबाबत त्याने तुळसाबाईला म्हटले"*, तसेच *"त्रास देणार नाही"*, तसेच *"तुळसाबाई मला सांगत होती की "नर्मदा तिला म्हणत होती की सासरी जायचे आहे, मला त्याठिकाणी नेवून सोडा"*. मात्र या बाबी माझ्या बयानात जशाच्या तश्या का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

९. मी पोलीसांना बयान देते वेळी असे सांगीतले होते की *"मात्र आरोपींनी नर्मदाला तिच्या घरी घेतले नाही, तर आरोपी हे घराला कुलूप लावून निघून गेले. <u>त्यानंतर</u> तुळसाबाई तेथून तिच्या घरी भोसा या गावी परत आली, मात्र, नर्मदा ही आरोपींच्या घराच्या समोरच थांबलेली होती"*.

( यावेळी आरोपीच्या वकिलांनी असा युक्तीवाद केला की साक्षीदाराच्या बयानामध्ये ही बाब रात्री आलेल्या फोनवर घडल्याचे नमूद करण्यात आल्याचे असल्यामुळे ही बाब साक्षीदाराच्या बयानात नसल्यामुळे ही बाब Omission असल्याचा आक्षेप त्यांनी घेतला. मात्र, सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांनी यास आक्षेप घेतला की ही बाब बयानामध्ये नमूद आहे. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद या आक्षेपावर ऐकला. पुराव्याचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की साक्षीदाराने सरतपासणीमध्ये असे सांगीतलेले आहे की:-

*"दिनांक २४/१२/२०१८ रोजी सकाळी मला तुळसाबाईचा फोन आला व तुळसाबाईने मला म्हटले की "भाउ मी, नर्मदा हिला बोरज या गावी (आरोपीच्या गावी) नेवून सोडत आहे / नेत आहे",* ***<u>त्यानंतर</u>*** *तुळसाबाईने नर्मदाला आरोपींच्या घरी आणले, मात्र*

*आरोपींनी नर्मदाला तिच्या घरी घेतले नाही, तर आरोपी हे घराला कुलूप लावून निघून गेले, त्यानंतर तुळसाबाई तेथून तिच्या घरी भोसा या गावी परत आली, मात्र, नर्मदा ही आरोपींच्या घराच्या समोरच थांबलेली होती".*

१०. उपरोक्त पुराव्याचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की साक्षीदाराने सरतपासणीमध्ये सकाळी आलेल्या फोनबाबतचा उल्लेख करुन **त्यानंतरची** घटना सांगीतलेली आहे. म्हणजे त्यानंतर घडलेल्या घटनेचा क्रम साक्षीदाराने सांगीतलेला असून त्यानंतरची ती वेळ दुपारी, संध्याकाळी किंवा रात्रीची सुध्दा असू शकते. सबब, आरोपीतर्फे उपस्थित करण्यात आलेला आक्षेप फेटाळण्यात आला).

११. हे म्हणणे खरे नाही की नर्मदा माझ्या बहिणीची मुलगी असल्यामुळे व ती मयत झाल्यामुळे मी माझी बहिण तुळसाबाईच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला**

**फेरतपास-काही नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)

दिनांक - ०२/०३/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.